# राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, महाराष्ट्र, मुंबई

जुने प्रशासकीय महाविदयालय आवार, रुम नं.1,2,5 व 6, हजारीमल सोमानी मार्ग,
छत्रपती शिवाजी टर्मिनस समोर,मुंबई-400 001.

| E-mail : mah-sforum@nic.in | टेलि.फॅक्स क्र. २२०१ ८५ ३९ | दुरध्वनी क्र. २२०५ ७४ ०९ |
|---|---|---|

जा.क्र.राआ/लेखा-20/कपाट दरपत्रक/2017/ 5018      दिनांक 18/09/2017

## जाहिर नोटीस

या जाहीर नोटीसाव्दरे असे कळविण्यात येते की, राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, महाराष्ट्र, मुंबई न्यायिक संचिका व गोपनिय संचिका सुरक्षित ठेवण्यासाठी 19 स्टील कपाटाची (Steel Cupboard) आवश्यकता असल्याने खरेदी करणे आहेत.

तरी या नोटीसाव्दारे वर नमुद केल्याप्रमाणे चांगल्या प्रतिची 19 स्टील कपाटे (Steel Cupboard) पुरविण्यासाठी जे निर्माते/ पुरवठादार/ संस्था इच्छुक त्यांनी त्यांची दरपत्रके खालील अटी व शर्ती अधीन राहून सदर नोटीस, राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, महाराष्ट्र,मुंबई. या कार्यालयाच्या संकेतस्थळावर व नोटीस बोर्डवर प्रसिध्द केल्यापासून 15 दिवसाच्या आत दरपत्रक या कार्यालयास सादर करावे.

## दरपत्रकाबाबत अटी व शर्ती

1. प्रत्येक निविदा कारास फक्त एक दरपत्रक देण्याची परवानगी असेल.
2. यशस्वी दरपत्रक हे खरेदी कार्यालयाने दरपत्रकासाठीच्या विनंतीमध्ये नमूद केलेल्या गरजांची पूर्तता करणारे सर्वात कमी किंमतीचे दरपत्रक असेल.
3. दरपत्रक धारकाने दरनिविदा सादर करताना त्यांचा VAT/CST क्रमांक दयावा VAT/CST क्रमांक लागू नसल्यास तत्सम प्रधिकरणकडील नोंदणी क्रमांक असल्यास निविदाकाराने पॅन कार्ड क्रमांक अथवा त्याची छायाप्रत देणे बंधनकारक राहिल.
4. दरपत्रके ही मा.प्रबंधक (प्रशासन), राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, महाराष्ट्र, मुंबई. यांचे नावे बंद लिफाफयात टाकून त्या लिफाफयावर <u>स्टील कपाटाची दरपत्रके</u> असे लिहून ती मा.प्रबंधक (प्रशासन),मुंबई यांच्याकडे कार्यालयीन वेळेत सादर करणे आवश्यक राहिल.
5. जे दरपत्रक धारक व्याप्ती आणि अटींची पुर्तता करीत नसतील त्यांना अपात्र ठरविण्यात येईल. तसेच काही अपरिहार्य कारणामुळे सदर दरपत्रके रदद करणेचे अधिकार मा.प्रबंधक (प्रशासन), राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, महाराष्ट्र, मुंबई. यांनी राखून ठेवले आहेत.
6. उपरोक्त नमूद स्टील कपाटे ही चांगल्या स्थितीत व दर्जाचे असणे आवश्यक असून ते संबंधीत कार्यालयाच्या ठिकाणी पोहच करणे बंधनकारक राहिल.

(स.ज्ञा.पवार)
प्रबंधक(प्रशासन),
राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग,
महाराष्ट्र,मुंबई.

**नोटीस बोर्डः-** सी.एस.टी./काळाघोडा/वेबसाईट इत्यांदीवर लावणे/टाकणे.

Office exp.